# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

०४ जानेवारी, २०१८



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


### ❖ पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहीमेतंर्गत अवैध दारूविक्रीच्या जिल्हयात एकुण १५ केसेस :-

महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दारूबंदी घोषीत करण्यात आलेली असुन पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन **दिनांक ०३/०१/२०१८ चे ००:०१ ते २३:५९ वाजता पर्यंत जिल्ह्यात पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर, रामनगर, वरोरा, ब्रम्हपुरी, चिमुर, पाथरी, सावली, राजुरा, लाठी** हद्दीत **एकुण १४,०९,०००/-रू.** ची अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनला एकुण **१५** गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असुन **०७** आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

---

### ❖ मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहन चालकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन भद्रावती :-**

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **भद्रावती** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे धोकादायकपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **भद्रावती** येथे अप.क्र. ०६/२०१८कलम २७९ भादंवि सह १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहेत. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **भद्रावती** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन राजुरा:-**

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **राजुरा** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **राजुरा** येथे अप.क्र. ०९/२०१८ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहेत. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **राजुरा** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन लाठी:-**

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन **लाठी** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **लाठी** येथे अप.क्र. ०२/२०१८ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहेत. सदर गुन्ह्यातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **लाठी** पोलीस करीत आहे.

---

### ❖ प्रतिबंधक कारवाई :-

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी जिल्ह्यात कलम ११०/११७ मुंबई पोलीस कायदा अन्वये **०४** ईसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

---

### ❖ मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई :-

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी जिल्ह्यात दारू प्राशन १८५ अन्वये **०३** व इतर केसेस **९०** असे एकुण **९३** केसेस करण्यात आल्या आहेत.

---

# जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस शिक्षा.

पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत मौजा वडगांव श्रीराम मंदीर जवळ पिडीत फिर्यादीवर जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस दिनांक ०३/०१/२०१८ रोजी **श्री. ए.झेड. खॉन, अति. जिल्हा सत्र न्यायाधीश यांनी शिक्षा** ठोठावली आहे.

पोलीस स्टेशन रामनगर अतंर्गत मौजा वडगांव श्रीराम मंदीर जवळ पिडीत फिर्यादी ही रात्रौ दरम्यान शौचालयास जावुन घरी परत येत असता **आरोपी नामे राजु गणपतराव मैदयवार वय ४० वर्षे रा. श्रीराम मंदीर जवळ वडगांव, चंद्रपूर** यांने ती एकटी असल्याची संधी साधुन पिडीत फिर्यादीला आपल्या घरात ओढत नेऊन तिच्या अंगावरील कपडे काढुन तिच्या सोबत जबरीने संभोग केला व कोणाला सांगशील तर तुला मारल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी दिली. अशा पिडीत फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. २४४/२०१५ कलम ३७६, ३२३, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन **सहा. पोलीस निरीक्षक सी.आर. काळे पो. स्टे. रामनगर** यांनी पुर्ण करून आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक **०३/०१/२०१८** रोजी आरोपी नामे राजु गणपतराव मैदयवार वय ४० वर्षे रा. श्रीराम मंदीर जवळ वडगांव, चंद्रपूर **यास कलम ३७६ भादंवि मध्ये ७ वर्षे सश्रम कारावास शिक्षा व १,०००/-रु दंड, दंड न भरल्यास १० दिवस शिक्षा, कलम ३२३ भादंवि मध्ये ६ महीने शिक्षा व ५००/-रु दंड, दंड न भरल्यास ५ दिवस शिक्षा, कलम ५०६ भांदवि मध्ये ३ महीने शिक्षा व ५००/-रु दंड, दंड न भरल्यास ५ दिवस शिक्षा श्री. ए.झेड. खॉन, अति. जिल्हा सत्र न्यायाधीश यांनी शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात** सरकार तर्फे **ॲड. श्री. देगापार, सहा. सरकारी अभियोक्ता, चंद्रपुर तर कोर्ट पैरवी म्हणुन नापोशि राजु मेश्राम पोस्टे रामनगर** यांनी काम पाहीले आहे.

---

चंद्रपूर पोलीस